26-05-2024-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 05/26/2024 12:03 AM Page 1



# श्रीलंका ४३ पाकिस्तानी कैद्यांनी मुक्त करणार

**देशांच्या सरकारांनी एक सामंजस्य करार**

**कोलंबो, दि. २५ :**

श्रीलंका सरकार त्यांच्या तुरुंगांमध्ये शिक्षा भोगत असलेल्या ४३ पाकिस्तानी कैद्यांना मुक्त करणार आहे जेणेकरून ते त्यांच्या मायदेशी परतू शकतील. एकमेकांच्या तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या घरवापसीसाठी दोन्ही देशांच्या सरकारांनी एक सामंजस्य करार केला आहे. त्याअंतर्गत श्रीलंका ४३ पाकिस्तानी कैद्यांना मुक्त करणार आहे. डॉन या पाकिस्तानी वृत्तपत्राने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. या वृत्तानुसार पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी शुक्रवारी (२४ मे) श्रीलंकेचे उच्चायुक्त ॲडमिरल (सेवानिवृत्त) रवींद्र चंद्र श्रीवजय गुणरत्ने यांच्याबरोबर एक बैठक केली. या बैठकीत दोन्ही देशांमध्ये कैद असलेल्या एकमेकांच्या नागरिकांच्या सुटकेबाबत चर्चा झाली. यी चर्चेअंती श्रीलंकेने ४३ पाकिस्तानी कैद्यांना मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

पाकिस्तानी गृहमंत्री आणि श्रीलंकेच्या उच्चायुक्तांमध्ये झालेल्या बैठकीत दोन्ही बाजूंनी परस्पर हितसंबंध, मैत्री आणि द्विपक्षीय संबंध आणखी विकसित करण्याच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. दोन्ही देशांची सुरक्षा, सागरी सुरक्षा आणि अंमली पदार्थविरोधी क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासाठी दोन्ही बाजूच्या प्रतिनिधींनी सहमती दर्शवली. पाकिस्तानचं गृहमंत्रालय ४३ पाकिस्तानी कैद्यांना परत आणण्यासाठी गेल्या महिन्यापासून श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करत होतं. या चर्चा आता यशस्वी झाल्या आहेत.

श्रीलंकेतील एका न्यायालयाने अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या १० पाकिस्तानी नागरिकांना नुकतीच शिक्षा सुनावली आहे. श्रीलंकेत ते मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची तस्करी करत होते. श्रीलंकेतील अंमली पदार्थ विरोधी पथकाने यांना पकडून सर्व पुरावे न्यायालयासमोर सादर केले. त्यानंतर श्रीलंकन न्यायालयाने त्यांना १०-१० वर्षांची शिक्षा सुनावली होती. या १० जणांनी त्यांच्या गुन्ह्याची कबुली देखील दिली होती. ते आता तुरुंगात शिक्षा भोगत आहेत.

# गुजरातमध्ये गेमिंग झोनमध्ये आग; १६ जणांचा मृत्यू

**सुरत, दि. २५ :**

गुजरातच्या राजकोट शहरातील एका गेमिंग झोनमध्ये शनिवारी संध्याकाळी भीषण आग लागली. यामध्ये जवळपास १६ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. टीआरपी गेम झोन येथे लागलेल्या आगीत अनेक लहान मुले आणि मोठी माणसे अडकले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अग्निशामक दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्याअसून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

राजकोटचे जिल्हाधिकारी प्रभाव जोशी यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, दुपारी सव्वा चार वाजता कंट्रोल रूमला आग लागल्याची माहिती देणारा फोन आला. त्यानंतर तातडीने अग्निशामक दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या. आग विझविण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. अजूनही आग विझलेली नाही. आग लागल्याच्या ठिकाणी ढिगाऱ्यात शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे. आतापर्यंत १६ लोकांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. युवराज सिंह सोलंकी नावाच्या माणसाचा हा गेमिंग झोन आहे, अशी माहिती राजकोटचे पोलीस आयुक्त राजू भार्गव यांनी दिली. गेमिंग झोनच्या मालकावर निष्काळजीपणाचा आणि त्यामुळे मृत्यू झाल्याचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बचाव कार्य पूर्ण झाल्यानंतर पुढील तपास सुरू करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी एक्सवरून या घटनेबद्दल भाष्य केले. ते म्हणाले, आग लागल्याची माहिती मिळताच महानगरपालिका आणि प्रशासनाला तात्काळ दक्ष राहण्यास सांगितले गेले. गेमिंग झोनमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. जखमींवर योग्य ते उपचार तातडीने करावेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

पान १ वरून

## देशात सहाव्या टप्प्यात ५९.०६ टक्के मतदान

मतदानापूर्वी भाजप कार्यकर्त्यांसोबत झालेल्या झटापटीत टीएमसी समर्थक जखमी झाला. कोलकाता उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश येथून भाजपचे उमेदवार आहेत. जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग-राजौरी येथील पीडीपीच्या उमेदवार मेहबूबा मुफ्ती संपावर बसल्या. ईव्हीएममध्ये छेडछाड केल्याचा आणि मोबाईलचे आउटगोइंग कॉल ब्लॉक केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर (करनाल), 'पीडीपी' च्या नेत्या मेहबूबा मुफ्ती (अनंतनाग-राजौरी), केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान (संभळपूर), भाजपचे नेते संबित पात्रा (पुरी), मेनका गांधी (सुलतानपूर), मनोज तिवारी (ईशान्य दिल्ली), अभिजित गंगोपाध्याय (तामलुक), अग्निमित्रा पॉल (मेदिनीपुर), नवीन जिंदाल (कुरुक्षेत्र), दिनेशलाल निरहुआ (आझमगड), 'आप' चे नेते सोमनाथ भारती (नवी दिल्ली), काँग्रेसचे राज बब्बर (गुरुग्राम), दीपेंद्रसिंह हुडा (रोहतक), कुमारी शैलजा (सिरसा) या प्रमुख उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत कैद झाले आहे.

## हंगामाच्या शेवटच्या आठवड्यात कळंगुट, कांदोळी पर्यटकांनी फुलले

जंक्शनवर या कोंडीचा सर्वाधिक फटका बसला. पे-पार्किंग ची जागा भरल्यानंतर सकाळी समुद्रकिनाऱ्याकडे जाणारा रस्ता बंद करण्यात आल्याने बागा सर्कलवर दिवसभर गोंधळाचे वातावरण होते.

कळंगुट चर्च ते पोस्ट ऑफिस जंक्शन दरम्यान शनिवारच्या आठवडी बाजारासाठी रस्ता बंद करण्यात आल्याने वाहतूक व्यस्त आणि रहदारीच्या कळंगुट कांदोळी रस्त्यावरील सेंट अँथनी चॅपल जंक्शनमार्गे वळविण्यात आल्याने सातत्याने वाहतूक कोंडी होत होती. सर्वच जंक्शनवर वाहतूक पोलिस असले तरी वाहनचालक व वाहनांना त्यांची फारशी मदत होत नव्हती. दरम्यान, दृष्टी मरीनने पर्यटक आणि रहिवाशांना समुद्रकिनाऱ्यांना भेट देताना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे, हवामानाच्या अद्ययावत माहितीची माहिती ठेवण्याचे आणि सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

**सावधगिरीचे आवाहन**

हवामान खात्याने नुकताच वर्तवलेला पाऊस आणि वादळी वाऱ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व समुद्रकिनाऱ्यावरील नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन दृष्टीतर्फे करण्यात आले आहे. रहिवासी आणि येथे येणाऱ्या समुदायाची तसेच पर्यटकांची सुरक्षा आमच्यासाठी अग्रस्थानी आहे. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे विशेषत: किनारी भागात सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. आमचे जीवरक्षक हाय अलर्टवर आहेत आणि या प्रतिकूल हवामान परिस्थितीमुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी पूर्णपणे तयार आहेत, असे दृष्टीने स्पष्ट केले आहे.

# रवळनाथ मंदिरातील चोरीप्रकरणी संशयितास ४ दिवसांची पोलिस कोठडी

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५** : नागेशी - बांदोडा येथील रवळनाथ मंदिरातील अंदाजे ४० ते ५० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मुकुट चोरी प्रकरणी फोंडा पोलिसांनी विकास वसंत नाईक (३९, शिरोडा ) याला अटक केली आहे. अटक केलेल्या संशयिताला न्यायालयाने ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ११ एप्रिल रोजी मंदिरातून अज्ञातांनी सोन्याचे मुकुट चोरी केल्याची तक्रार मंदिराचे अध्यक्ष विनोद मधुकर तिळवे यांनी दिली होती. पोलिसांनी चोरीप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा नोंद केला होता. काही दिवसापूर्वी संशयिताला फातोर्डा पोलिसांनी अटक केली होती.

त्यावेळी संशयिताने फोंडा परिसरात चोरी केल्याची कबुली दिली होती. फोंडा पोलिस स्थानकाचे निरीक्षक तुषार लोटलीकर या प्रकरणी तपास करीत आहे.

# विलवडेत शाळेच्या कंपाऊंडला डंपरची धडक

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि.२५** : बांदा - दाणोली मार्गावर विलवडेत अपघाताचे सत्र सुरुच आहे. विलवडे शाळा नं १ च्या संरक्षण भींतीला डंपरने धडक दिल्याने संरक्षण भिंत पडून मोठे नुकसान झाले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवीतहानी झाली नाही. चालकही बचावला. ट्रकचे मोठे नुकसान झाले.

बांदा-दाणोली रस्त्यांचे डांबरीकरण झाल्याने वाहनचालक सुसाट वेगात जात आहेत. वेगमर्यादा नियंत्रणात नसल्याने हा अपघात झाल्याचे विलवडे सरपंच प्रकाश दळवी यांनी सांगितले. शुक्रवारी सायंकाळी हा डंपरचालक विलवडे मार्गे बांद्यांच्या दिशेने काळा दगड डस्ट घेऊन जात होता. जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा विलवडे नं.१ शाळेसमोर चालकाचा ताबा सुटून संरक्षण भिंतीला डंपरने मोठी धडक दिल्याने दगडी सरंक्षण भिंती कोसळून जमीनदोस्त झाली. शाळेचे मोठे नुकसान झाले. सरपंच प्रकाश दळवी यांनी मध्यस्थी करत डंपर मालकाने दगड सरंक्षण भिंत बांधून देणार असल्याने आपसात तडजोडीने हे प्रकरण मिटविण्यात आले. अपघाताची नोंद बांदा पोलिसात करण्यात आली नाही.



विलवडे : नं.१ शाळेच्या संरक्षण भिंतीला डंपरने मोठी धडक दिल्याने कोसळलेली भिंत. (आशुतोष भांगले)

बांदा-दाणोली जिल्हामार्गा हा खड्डेमुक्त झाला असला तरी काही ठिकाणी रस्ता अरुंद व वळणावळणाचा, सहा गाव, अनेक शाळा आहेत. तसेच खडी वाहतूक करणारे डंपर, मालवाहतूक करणारे ट्रक, अवजड वाहने, यामुळे हा मार्ग अपघाताला नेहमीच निमत्रंण देत आहे.रस्त्यावर साईड पट्ट्यांवर सफेद पट्टे मारणे,गतिरोधक असलेल्या ठिकाणी रिफ्लेक्टर्स लावणे, आवश्यक त्या ठिकाणी रंबलर्स लावणे, दिशादर्शक फलक, वेग मर्यादा फलक लावणे अति आवश्यक आहे.

# राय येथे परवानगीविना महामार्गावर खोदकाम

**त्वरित कारवाईची राय पंचायतीची मागणी**

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५** : आर्ले राय येथे राष्ट्रीय महामार्गावर बेकायदा खोदकाम केल्याचा दावा स्थानिक तसेच राय पंचायतीने केला असून, त्यावर त्वरित कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. सदर खोदकाम जलवाहिनी टाकण्यासाठी करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले असले तरी त्यासाठी स्थानिक पंचायत आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आलेली नसल्याचे समोर आले आहे.

घटनास्थळी पाहणी केल्यानंतर राय पंचायतीने मायणा - कुडतरी पोलिसांना पत्र लिहिले आहे. बेकायदा रस्त्याचे खोदकाम करण्याच्या या प्रकाराविरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. उपसरपंच तथा स्थानिक पंच गॉडफ्रे ऑस्वाल्ड डिसोझा यांनी सांगितले की, सदर विषय महामार्ग प्राधिकरणाकडे नेण्यात आला आहे. या ठिकाणी आधीच अपघातप्रवण क्षेत्र असल्याने खोदकामामुळे प्रवासी तसेच ग्रामस्थांसाठी धोका वाढला आहे. संबंधितांनी यावर त्वरित कारवाई करून स्थानिकांना दिलासा दिला पाहिजे, असे ते म्हणाले.

# प्रमुख निर्देशांकांची ऐतिहासिक उच्चांकी नोंद!

**मुंबई, दि. २५ :**

शनिवारी संपलेल्या सप्ताहामध्ये भारतीय शेअर बाजारांवर केवळ तेजीचाच प्रभाव राहिला नाही तर या शब्दाचा दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी नवीन ऐतिहासिक उच्चांकी पातळी नोंदवलेली होती. या सप्ताहभरात मुंबई शेअर निर्देशांकामध्ये १४०४.४५ अंशांची किंवा १.९० टक्क्यांची वाढ होऊन तो अखेरीस ७५ हजार ४१०.३९ अंश पातळीवर बंद झाला. त्याचप्रमाणे मिडकॅप निर्देशांकात १.१ टक्क्यांची तर स्मॉल कॅप निर्देशांकात ०.०८ टक्क्यांची वाढ झालेली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी या सप्ताहात ४५५.१० अंशांनी वर जाऊन २२ हजार ९५७.१० अंश पातळीवर बंद झाला.

**बुल अँड बेअर**
**प्रा. नंदकुमार काकिर्डे**

या सप्ताहात दि.२० मे रोजी शेअर बाजारात मुंबईतील लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठीची सुट्टी असल्याने व्यवहार झाले नाहीत. त्यामुळे हा सप्ताह केवळ चार सत्रांचा झाला. दि. २१ रोजीच्या सत्रामध्ये वातावरण काहीसे प्रतिकूल राहिल्याने दोन्ही प्रमुख निर्देशांकात थोडीशी घसरण झालेली होती. या सत्रात मुंबई शेअर निर्देशांक ५२.६३ अंशांनी तर निफ्टी २७.०५ अंशांनी खाली घसरलेला होता. दि. २२ रोजीच्या सत्रामध्ये खरेदीदारांनी चांगला पाठिंबा दिल्यामुळे मुंबई शेअर निर्देशांकामध्ये २६७.७५ अंशांची तर निफ्टी मध्ये ६८.७५ अंशांची उत्तमवाढ झालेली होती. दि. २३ रोजीच्या सत्रात खरेदीदारांनी दिलेल्या अभूतपूर्व पाठिंब्यामुळे या सत्रात मुंबई शेअर निर्देशांकाने ११९६.९८ अशांची अभूतपूर्व उसळी मारली त्याचप्रमाणे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक ही तब्बल ३६९.८५ अंशांनी वरती गेलेला होता. शुक्रवार दिनांक २४ मे च्या अखेरच्या सत्रामध्ये वातावरण काहीसे नकारात्मक राहिले.त्यामुळे मुंबई शेअर निर्देशांकात ७.६५ अंशांची तर निफ्टी मध्ये १०.५५ अंशांची थोडीशी घट झालेली होती.एकंदरीत सप्ताहातील चार सत्रांपैकी दोन सत्रात अनुकूलता व उर्वरित दोन सत्रात प्रतिकूल असे वातावरण राहिले.

सप्ताहातील या संमिश्र वातावरणामुळे अनेक प्रमुख कंपन्यांमध्ये या कालावधीत बऱ्यापैकी चढ-उतार पहावयास मिळाले. यामध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज चा भाव गेल्या सप्ताहात ३.१७ टक्क्यांनी वरती जाऊन २९५९.८० रुपये पातळीवर बंद झाला. हिंदालको इंडस्ट्रीज मध्ये २.८२ टक्क्यांची उत्तम वाढ होऊन त्याचा भाव ६७३.१० रुपयांवर स्थिरावला. ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन म्हणजे ओएनजीसी चा भाव या सप्ताहात १.२९ टक्क्यांनी वर जाऊन २८३.२० रुपये पातळीवर बंद झाला. आयटीसीमध्येही गेल्या सप्ताहात ०.०१ टक्क्यांची वाढ झाली व त्याचा भाव ४३६.१० रुपयांवर स्थिरावला. गोदरेज उद्योग समूहातील गोदरेज प्रॉपर्टीज या कंपनीचा भाव गेल्या सप्ताहात ४.१३ टक्क्यांनी खाली घसरला व अखेरीस २७३७.१५ रुपये पातळीवर बंद झाला. या कंपनीच्या कांदिवली येथील गृह प्रकल्पाबाबत संरक्षण मंत्रालयाने घेतलेल्या आक्षेपापोटी ही घसरण झाल्याचे सांगण्यात आले.

# पंचवाडी अपघातप्रकरणी टँकर चालकाला अटक व सुटका

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५** : मापा- पंचवाडी येथे शुक्रवारी दुपारी टँकर, ट्रक व कार यांच्यात झालेल्या अपघातप्रकरणी फोंडा पोलिसांनी टँकरचा चालक सुदेश महादेव देसाई ( ४२, देसाईवाडा- सांगे) याच्या विरुद्ध केला गुन्हा नोंद केला आहे. गुन्हा नोंद केलेल्या ट्रकचालकाला पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याची जामीनावर सुटका करण्यात आली आहे. अपघातात हसन अब्बास शिलेदार ( ४२, आनंदवाडी- सावर्डे) याचा जागीच मृत्यू झाला होता.

शुक्रवारी टँकर, खडीवाहू ट्रक व कार यांच्या झालेल्या अपघातात टँकर मधील एकाचा जागीच मृत्यू झाला होता. तर कार मधील चंद्रावती मोरजकर ( ७०, पेडणे) ही महिला व टँकर मधील हुसेनभाशा जनतखान ( १८, कर्नाटक) हे दोघे जण अपघातात जखमी झाले होते. अपघातानंतर शिरोडा ते सावर्डे मार्गावरील वाहतूक अंदाजे ३ तास ठप्प झाली होती. अपघातप्रकरणी टँकर चालकाला पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याची जामिनावर सुटका करण्यात आली.

# दृष्टी मरीनतर्फे सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी दि. २५** : भारतीय हवामान खात्याने गडगडाटी वादळ येण्याचा अंदाज व्यक्त केल्यानुसार राज्य-नियुक्त जीवनरक्षक एजन्सी, दृष्टी मरीन, पर्यटक आणि रहिवाशांना राज्याच्या लोकप्रिय समुद्रकिनाऱ्यांना भेट देताना आवश्यक सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने गुरुवारी येलो अलर्ट चेतावणी वाढवली होती आणि २६ मे पर्यंत गोव्याच्या किनारपट्टीवर ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वाऱ्यासह विजांचा कडकडाट आणि गडगडाटासह हलका ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवला होता. हवामानाचा परिणाम किनारी भागावर होण्याची शक्यता असल्याने दृष्टी मरीनतर्फे लोकांना समुद्रकिनाऱ्यांना भेट देताना हवामानाच्या अपडेटबद्दल माहिती ठेवण्याचा आणि सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे.

हवामान विभागाने नुकत्याच केलेल्या पावसाचा आणि गडगडाटी वादळांचा अंदाज घेऊन आम्ही सर्व समुद्रकिनारी जाणाऱ्यांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. आमचे लाइफसेव्हर्स हाय अलर्टवर आहेत आणि या प्रतिकूल हवामानामुळे उद्‌भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी पूर्णपणे तयार असल्याचे दृष्टी मरीन समुहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नवीन अवस्थी यांनी स्पष्ट केले.

# न्हयबाग येथील जंक्शन रद्द करुन दुसऱ्या ठिकाणी करावे

**सामाजिक कार्यकर्ते शंकर पोळजी तसेच विविध संघटनांची मागणी**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २५ :** राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील न्हयबाग येथील जंक्शन हे सरकारने पेडणेकरांचे मृतदेह मोजण्यासाठी तयार केले आहे का, असा संतप्त सवाल करत सरकारने हे जंक्शन तातडीने रद्द करुन अन्य दुसऱ्या ठिकाणी करावे, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते शंकर पोळजी, स्थानिक तसेच विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

न्हयबाग जंक्शनवर शुक्रवारी झालेल्या अपघातात तोरसे येथीस सविता नाईक या ५० वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाल्यानंतर शनिवारी न्हयबाग जंक्शन याठिकाणी पत्रकार परिषद आयोजित करुन असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा स्थानिक नागरिकांनी केला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते शंकर पोळजी यांनी अपघाताबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत सरकारच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले. अनेकवेळा याठिकाणी अपघात होऊनही आतापर्यंत सरकारला जाग आली नाही. याच ठिकाणी हल्लीच अपघात होऊन दोनजणांचा मृत्यू झाला आहे; मात्र सरकार आणि एम.व्ही. आर रस्ता विभाग कंपनी यांना कुणाची पर्वा नाही. हे सरकार आणि एम.व्ही . आर. कंपनी लोकांचा मृतदेह मोजण्याचे काम करते का, असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते शंकर पोळजी यांनी याठिकाणी भेट देऊन पत्रकार परिषदेत केला .

यावेळी काँग्रेसचे ॲड. जितेंद्र गावकर, सामाजिक कार्यकर्ते ॲड. प्रसाद शहापूरकर , भास्कर नारुलकर, इजिदोर रॉड्रिग्स, अभिषेक नाईक, जुवांव फर्नांडिस, साहिल तेली, कॉस्ता फर्नाडिस आदी यावेळी उपस्थित होते.

शंकर पोळजी म्हणाले की, राष्ट्रीय महामार्ग ६६ क्रमांकावर न्हयबाग येथे असलेले जंक्शन मृत्यूचा सापळा बनले आहे. याठिकाणी अनेक अपघात होऊन सरकार डोळेझाक करीत आहे.

याठिकाणी सर्व्हिस रस्ते नाहीत. सरकार मात्र या गोष्टींबाबत डोळ्यावर पट्टी बांधून आहे. अनेक वेळा सामाजिक कार्यकर्त्यांसोबत आपणही याबाबत आवाज उठवला. आपण दोष कुठल्याही राजकीय व्यक्तीला देत नाही; मात्र सरकारचे जे अधिकारी आहेत, सरकारची यंत्रणा आहे, त्यांना आपण दोष देतो. त्याने याठिकाणी लक्ष देणे गरजेचे होते. हा रस्ता धोकादायक स्थितीत असल्याची माहिती असूनही याठिकाणी उड्डाणपूलाची सोय करण्यात आली नाही. सरकारने तातडीने या ठिकाणचे जंक्शन त्वरित बंद करावे, दुसऱ्या ठिकाणी जंक्शन करावे, अशी मागणी यावेळी पोळजी यांनी केली. इजिदोर रॉड्रिक्स म्हणाले की, आतापर्यंत अनेक अपघात झाले. वेळोवेळी अपघाताबाबत वर्तमानपत्रातून आणि सामाजिक माध्यमातून आवाज उठवला जातो. मात्र आमच्या आवाजाकडे सरकार पहात नाही. अनेकवेळा याठिकाणी अपघात झाले. आतापर्यंत अपघातात दोघाजणांचे बळी गेले आहेत. अनेकजण मोडून पडले आहेत; मात्र याठिकाणी कुणालाही त्याची पर्वा नाही.

आमदार प्रवीण आर्लेकर यांनी वेळोवेळी याबाबत आवाज उठवला. या जंक्शनाबाबत अधिकाऱ्यांना सांगितले; मात्र त्याकडेही सरकारी यंत्रणेने दुर्लक्ष केले. याठिकाणी तोरसे येथील महिलेचा नाहक बळी गेला . त्यासाठी आम्ही परत एकदा सरकारकडे मागणी करत आहोत की या ठिकाणी असलेले जंक्शन त्वरित बंद करावे. याठिकाणी उड्डाणपूल व्हावे, तसेच अंडरप्रास व्हावा, यासाठी आम्ही वेळोवेळी मागणी केली होती. मात्र आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने आज ही स्थिती उद्भवली आहे .

ॲड. जितेंद्र गावकर म्हणाले की, बांधकाम कंपनीने रस्ता बनविताना कुठल्याही प्रकारे स्थानिकांना विश्वासात घेतले नाही. आम्ही याबाबत वेळोवेळी आवाज केला, मात्र त्यांनी त्याची पर्वा केली नाही. अनेक वाहनांना याठिकाणी अपघात होत आहेत. 'अपघात क्षेत्र' म्हणून हे जंक्शन प्रसिद्ध आहे. असे असतानायाठिकाणी सरकार कुठलीही खबरदारी घेत नाही . हे जंक्शन बंद करावे, अशी आम्ही वेळोवेळी मागणी केली आहे.



पेडणे : न्हयबाग येथील पत्रकार परिषदेत बोलताना शंकर पोळजी , सोबत ॲड.जितेंद्र गावकर , ॲड. प्रसाद शहापूरकर, इजिदोर रॉड्रिग्स व इतर.

**NOTICE**

My Husband **Late Amonkar Gopinath** was owning **Maruti Suzuki Ertiga VDI BSIV Car** bearing **Reg. No. GA-05-D-3133.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 25.05.2024

Sd/-
**Smt. Jijabai Gopinath Amonkar**
H. No. 248, Nr. Deepvihar Primary School, Headland Sada, M.P.T. Colony, Mormugao, South Goa-403804

Sandeep Ads

**पाहिजेत**

AGSAR PAINTS Looking a Competitive and Trustworthy Field Sales Executive. Graduation not Mandatory. Freshers Also Apply. Send CV : resumes@agsar.net Call : 9840691864

---------------------------

An Opportunity in Becoming your own Boss work from home, earn supplemental income, training and support provided. Detail Call: 9867039050.

# ३४ लाखांची खंडणी मागितल्याने लोकेश कवळेकरला अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५** : आपल्या आईवडीलांना जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांच्याकडे ३४ लाख रुपयांची खंडणी मागितल्याबद्दल दोनापावल येथील आर्यन सडवेलकर यांनी ४८ वर्षीय लोकेश कवळेकर यांच्याविरोधात पणजी पोलिसात तक्रार दाखल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार दि. २४ रोजी दोनापावल येथील रहिवासी आर्यन सडवेलकर यांनी आरोपीविरोधात तक्रार दाखल केली. पणजी येथे मालमत्तेच्या मुद्यावरून ४८ वर्षीय लोकेश सुरेश कवळेकर आपल्या आई-वडिलांना जीवे मारण्याची भीती दाखवून ३४ लाख रुपयांची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान पणजी पोलिसांनी भारतीय दंड संहिता ३८६ कलमांतर्गत आरोपीविरोधात गुन्हा नोंदविला होता.